अमरावती-नागपूर-चंद्रपुर-वर्धा-यवतमाळ-अकोला-वाशिम-बुलढाणा-खामगांव

Postal Lic./AMT/RNP/492/2026-2028

वरुड | शनिवार
११.०७.२०२६

वरुड दर्पण
जनसामान्यांच्या मनातील आरसा

RNI REGD.NO.MAHMAR/2019/78235

chandubhad@gmail.com
www.waruddarpan.com
9422157712, 8669533485

वर्ष: ०७ | अंक: १६१ | पृष्ठे: ०६ | किंमत: ०२

संपादक - चंद्रकांत भा. भड

+91 7745067712

# पोक्सो गुन्ह्यात जामीनावर बाहेर येताच पत्नी, २ मुलांसह ६ जणांची निर्घृण हत्या

(प्रतिनीधी वरूड दर्पण)



**हैदराबाद** – तेलंगणातील रंगारेड्डी जिल्ह्यातील शाबाद येथे अत्यंत धक्कादायक हत्याकांड उघडकीस आले आहे. पॉक्सो कायद्यांतर्गत दाखल झालेल्या गुन्ह्यात अटकपूर्व जामीनावर बाहेर आलेल्या आरोपीने पत्नी, दोन लहान मुलांसह लैंगिक छळाची तक्रार करणाऱ्या अल्पवयीन मुलगी, तिची आई आणि आजीची निर्घृण हत्या केल्याचा आरोप आहे. या सहा हत्यांनंतर आरोपी फरार झाला असून, त्याच्या शोधासाठी पोलिसांनी विशेष पथके तैनात केली आहेत.

पत्नी आणि दोन लहान मुलांची हत्या पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ३५ वर्षीय राजकुमार याने शुक्रवारी रात्री शाबाद येथील आपल्या राहत्या घरी पत्नी पार्वती सरिता (वय ३०) आणि ४ व १ वर्षांच्या दोन मुलांवर प्राणघातक हल्ला करून त्यांची हत्या केली पोक्सो तक्रार करणाऱ्या अल्पवयीन मुलीचाही खून घरातील हत्येनंतर आरोपी १७ वर्षीय अल्पवयीन मुलीच्या घरी गेला. या मुलीने १६ मे रोजी त्याच्याविरोधात प्रोटेक्शन ऑफ चिल्ड्रेन फ्रॉम सेक्स्युअल ऑफेन्सेस अलीं अंतर्गत तक्रार दाखल केली होती. आरोपीने तिला कारमधून निर्जनस्थळी नेऊन हत्या केल्याचा आरोप आहे. याचवेळी त्याने मुलीची ४५ वर्षीय आई आणि ६५ वर्षीय आजीचीही हत्या केली. मात्र, घरात उपस्थित असलेल्या मुलीच्या २० वर्षीय दिव्यांग बहिणीला कोणतीही इजा करण्यात आली नाही. वडिलांना फोन करून दिली गुन्ह्यांची कबुली हत्याकांडानंतर आरोपीने आपल्या वडिलांना फोन करून सर्वांची हत्या केल्याची माहिती दिली. त्यानंतर त्याने मोबाईल बंद केला.

आरोपीच्या शोधासाठी विशेष पथके पोलीस अधिकारी तरुण जोशी यांनी सांगितले की, आरोपी फरार असून त्याच्या शोधासाठी विशेष पथके स्थापन करण्यात आली आहेत. काही महत्त्वाचे धागेदोरे मिळाले असून, त्याला लवकरच अटक करण्यात येईल, असा विश्वास पोलिसांनी व्यक्त केला आहे.

# देवाभाऊंनी मराठे म्हणून दिल्लीला जावं, देशाचं उज्वल स्वप्न पूर्ण करावं

## तर एकनाथ शिंदेंकडे राज्यच नेतृत सोपवावं, कारण....: बच्चू कडूंनी सांगितलं राज‘कारण’

(प्रतिनीधी वरूड दर्पण)



**मुंबई** – महाराष्ट्रातला प्रत्येक माणसाला वाटत कि महाराष्ट्रातल्या नेत्याने देशाचं नेतृत्व करावं, एक काळ असा होता कि देशभरात मराठयांच राज्य होतं.

त्याच प्रमाणे देवेंद्र फडणवीस यांनी मराठे म्हणून दिल्लीला जावे आणि देशाचं उज्वल स्वप्न पूर्ण करावे, अशी सर्वांची अपेक्षा आहे. देवेंद्र फडणवीस दिल्लीला गेले कि राज्यच नेतृत एकनाथ शिंदे यांच्याकडे सोपवावे, अशी मागणी शिवसेना शिंदे गटाचे विधान परिषदेचे आमदार बच्चू कडू यांनी केली आहे. ते नागपुरात बोलत होते. एकनाथ शिंदे यांनी उठाव केला म्हणून महाराष्ट्रात भाजप सत्तेत परत आली. त्यामुळे संख्याबळाचा विचार न करता नैतिकतेच्या आधारावर देवेंद्र फडणवीस जर दिल्लीवर गेलेत तर राज्याचं नेतृत एकनाथ शिंदे यांनाच मिळायला पाहिजे. असेही बच्चू कडू म्हणाले. ज्येष्ठ मंत्री म्हणून जर देवेंद्र फडणवीस केंद्रात गेले, तर १०० टक्के मला असं वाटतं की चंद्रशेखर बावनकुळे यांचा विचार आणि शिफारस हे स्वतः देवेंद्र फडणवीसच करतील, हे माझं आकलन आहे. अशी प्रतिक्रिया ठाकरेंच्या शिवसेनेचे खासदार संजय राऊत यांनी दिली आहे. यावर बोलताना बच्चू कडू यांनी प्रतिक्रिया देत भाष्य केलं आहे.

**देवा भाऊंनी देशाची सूत्रे हाती घ्यावे, एकनाथ शिंदे यांनी महाराष्ट्रात एन्ट्री करावी**

देवा भाऊंनी निश्चितच दिल्लीचे तयारी करावी, देशाची सूत्रे हाती घ्यावे आणि या ठिकाणी निश्चितच मला वाटते की शिंदे साहेबांनी महाराष्ट्रात एन्ट्री करावी. आम्ही देशात पाहतोय कि, देशात देवा भाऊ आणि महाराष्ट्रात शिंदे साहेब, असा प्रवास झाला पाहिजे. तर संजय राऊत यांची भविष्यवाणी कधीच कुठे खरी ठरली नाही. त्यामुळे त्यांनी आता कोणत्या ज्योतिषाजवळ हात पहिला? यांनी त्या ज्योतिषाने कोणाचा हात पाहिला हे माहित नाही, त्यामुळे याला काही अर्थ उरत नाही. संजय राऊत यांनी बावनकुळे यांचं नाव मुख्यमंत्री पदासाठी यांच्याकडे पुढे केले. मात्र संजय राऊत यांच्याकडे जो जोतिष्य आला तो कोणत्या पक्षातून आला हे तपासणे महत्वाचे आहे.

## थोडक्यात

### अहिल्यानगरमध्ये झेडपीच्या पाणीपुरवठा विभागातील ६ अभियंते निलंबित

(प्रतिनीधी वरूड दर्पण)

**अहिल्यानगर** – अहिल्यानगर मध्ये कारवाईचा धडाका सुरूच असल्याचे पुन्हा एका घटनेतून अधोरेखित झाले आहे. ‘जलजीवन मिशन’अंतर्गत राबविण्यात आलेल्या ग्रामीण पाणीपुरवठा योजनांतील अनियमितता, निकृष्ट दर्जाची कामे आणि शासनाच्या निधीचा अपव्यय झाल्याप्रकरणी अहिल्यानगर जिल्ह्यात मोठी कारवाई करण्यात आली आहे.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या चार अधिकाऱ्यांनंतर आता जिल्हा परिषदेच्या ग्रामीण पाणीपुरवठा विभागातील सहा अभियंत्यांनाही निलंबित करण्यात आले आहे.

# दुधाची तहान ‘पिशवी’वर : सुट्या पिशवीतून दूधविक्रीला एफडीएची बंदी

## ...अन्यथा होणार ३ लाखांचा दंड

(प्रतिनीधी वरूड दर्पण)

**मुंबई** – तुमच्या घरात नेहमीचा ‘दूधवाला’ आता सकाळी तुमच्या घराची बेल वाजवणार नाही. कारण, अन्न आणि औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी संपूर्ण महाराष्ट्रात सुट्या दुधाच्या विक्रीवर तातडीने बंदी घातली आहे. पिढ्यानपिढ्या हजारो दूधवाले लाखो घरांमध्ये दूध पोहोचवत होते. चेंबूरमधील दूध विक्रेते राजमणी पाल म्हणाले की, ‘मी दुकान बंद केले आहे. माझे कर्मचारी आता बेरोजगार होतील. माझ्यासारखी शेकडो दुकाने बंद झाली आहेत कारण सुटे दूध विकल्यास ३ लाख रुपयांचा दंड आहे. यामुळे हजारो लोक बेरोजगार होतील.’ याबाबत मुंढे यांच्याशी संपर्क होऊ शकला नाही. परंतु, ‘फ्री प्रेस जर्नल’कडे त्यांच्या ३ जुलै २०२६ च्या आदेशाची प्रत आहे, ज्यात म्हटले आहे की, ‘एफडीएने केलेल्या तपासणीत संपूर्ण डेअरी पुरवठा साखळीत नियमांचे व्यापक आणि सातत्यपूर्ण उल्लंघन होत असल्याचे समोर आले आहे.’

# सत्तेत आल्यानंतर विचारधारा बदलली काय? सावरकर यांना भारतरत्न विलंब

## सुधीर मुनगंटीवार यांचा टोला

(प्रतिनीधी वरूड दर्पण)



**मुंबई** – स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांना ‘भारतरत्न’ पुरस्कार देण्याच्या प्रस्तावाला विलंब का होत आहे, असा घरचा आहेर देत भाजप आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी शुक्रवारी राज्य विधानसभेत आपल्याच सरकारला धारेवर धरले.

सत्तेवर आल्यानंतर पक्षाने आपली विचारधारा बदलू नये आणि या मुद्द्यावर सरकारची भूमिका बदलली असेल, तर त्यांनी ते उघडपणे सांगावे, असे मुनगंटीवार यांनी सभागृहात म्हटले. सावरकर यांना ‘भारतरत्न’ देण्यास विलंब होत असल्याबद्दल आपल्याला दुःख झाल्याचेही त्यांनी नमूद केले. मुनगंटीवार म्हणाले की, सत्तेत येणे म्हणजे आपली वैचारिक भूमिका बदलणे असा होत नाही. सत्तेत आल्यानंतर जर तुमची विचारधारा बदलली असेल, तर मी हा मुद्दा पुन्हा कधीही उपस्थित करणार नाही. परंतु तुमची कृती आणि तुम्ही ज्या विचारधारेचे पालन करण्याचा दावा करता, त्यात मेळ दिसत नाही.

मुनगंटीवार म्हणाले की, ‘सावरकरांच्या विचारधारेसाठी आयुष्य समर्पित करणारा एक कार्यकर्ता म्हणून, आमचे स्वतःचे सरकार या फाइलवर ढिम्म बसून असल्याचे पाहून मला दुःख होत आहे.

यापुढे मी हा मुद्दा कधीही उपस्थित करणार नाही.’ विलंबाने सावरकर यांना छळू नका ‘स्वातंत्र्यवीर सावरकरांनी ब्रिटिशांच्या हातून अनन्वित छळ सहन केला. किमान आपण तरी अगदी नकळतपणे, आपल्या विलंबाने त्यांना छळायला नको. आपल्याला फक्त एक प्रस्ताव मंजूर करायचा आहे.

# जेवणाच्या वादातून तरुणावर जीवघेणा हल्ला : एका विरुद्ध गुन्हा दाखल

(प्रतिनिधी वरूड दर्पण)




**वरुड** – शहरातील रामकृष्ण कॉलनी परिसरात जेवणाच्या कारणावरुन झालेल्या वादातून एका तरुणावर जीवघेना हल्ला केल्याची घटना घडली. या प्रकरणी वरुड पोलिसांनी एका आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करुन पुढील तपास सुरु केला आहे.

पोलीस सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी व आरोपी हे फर्निचरचे काम करीत असून, कामानिमित्त ते मक्कापुरी, वरुड येथे राहत होते. जेवणाची जबाबदारी फिर्यादीवर होती. जेवणाबाबत विचारणा केली असता आरोपी शिवीगाळ करु लागला. त्यानंतर आरोपीने लाकडी काठीने फिर्यादीच्या डाव्या कपाळावर, डाव्या खांद्यावर व डाव्या हाताच्या मनगटावर मारहाण करुन जखमी केले.

या प्रकरणी वरुड पोलिसांनी कलम ११८(१) व ३५२ अन्वये गुन्हा दाखल करुन पुढील तपास सुरु केला आहे.

# अल्पवयीन मुलीला पळवुन बळजबरीने लावले लग्न

## सात जणांविरुद्ध गुन्हा

(प्रतिनिधी वरूड दर्पण)




**शेंदुरजनाघाट** – शेंदुरजनाघाट पोलीस ठाण्याच्या हद्दीतील एका १७ वर्षीय अल्पवयीन मुलीला फूस लावून तिचे जबरदस्तीने लग्न लावल्याप्रकरणी सात जणांविरुद्ध बालविवाह प्रतिबंधक कायद्यासह विविध कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीस सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी अल्पवयीन मुलगी वय १७ वर्षे हिला आरोपी क्रमांक १ ते ६ यांनी आरोपी क्रमांक ७ याच्यासोबत लग्न करण्यासाठी प्रवृत्त केले. मुलीने तिचे वडील देवराव गिरीजी कुमरे यांना फोन करुन लग्नास जबरदस्तीने लावले जात असल्याची माहिती दिली. तसेच तिचे वय १८ वर्षे पूर्ण झाले नसल्याचेही सांगितले. त्यानंतरही वडिलांनी लग्नास विरोध केल्यास विष पिऊन मरेल, अशी धमकी देत संबंधितांनी अल्पवयीन मुलीचे लग्न लावून दिल्याचा आरोप फिर्यादीने केला आहे. याबाबत मुलीच्या जबानीवरुन वरुड पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला.

या प्रकरणात योगिता कमलेश पाटील, कमलेश पाटील, अर्पिता प्रभाकर धुर्वे, पंचफुला गणेश कवडेती, नितेश देवराव नवटके, देवराव गिरीजी कुमरे आणि रुपेश बलदेव कवडेती यांच्याविरुद्ध कलम २२९(२), ९, १०, ११ अन्वये गुन्हा दाखल करुन पुढील तपास सुरु केला आहे.



# अन्न सुरक्षा कायदा कडक : अंमलबजावणीची बोंब, अन्न व औषध प्रशासन मंत्री झिरवाळ यांची कबुली

■ (प्रतिनीधी वरुड दर्पण)



**मुंबई** – अन्न भेसळीच्या विरोधात सध्याच्या कायद्यात आधीच कडक तरतुदी आहेत, परंतु अंमलबजावणीमध्ये अनेकदा अंमलबजावणी यंत्रणा आणि प्रयोगशाळेशी संबंधित मर्यादांमुळे विलंब होतो, अशी माहिती अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांनी शुक्रवारी दिली. विधानसभेत अन्न भेसळ करणाऱ्यांना जन्मठेप किंवा फाशीची शिक्षा देण्याच्या मागणीला ते उत्तर देत होते.

जालना येथील एका तूप उत्पादक कारखान्याविरुद्ध भेसळीच्या आरोपावरून केलेल्या कारवाईबाबत भाजप आमदार प्रकाश सोळंके यांनी विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना झिरवाळ म्हणाले की, अशा प्रकरणांमध्ये सरकार कठोर कारवाई करेल. जालना कारखान्यातून गोळा केलेल्या आठ नमुन्यांपैकी सहा नमुने निकृष्ट दर्जाचे आढळले आहेत. त्यानुसार, अन्न सुरक्षा कायद्यांतर्गत संबंधित कंपनीवर कारवाई सुरू करण्यात आली आहे. अन्न भेसळ करणाऱ्यांना जन्मठेप किंवा फाशीची शिक्षा देण्याच्या मागणीवर झिरवाळ म्हणाले की, सध्याचा कायदा आधीच कडक आहे, परंतु अंमलबजावणी आणि प्रयोगशाळांशी संबंधित मर्यादांमुळे अनेकदा कारवाईला विलंब होतो. गुन्ह्याच्या तीव्रतेनुसार कायद्यात आधीच १ लाख रुपयांच्या दंडापासून ते जन्मठेप, अगदी फाशीच्या शिक्षेपर्यंतची तरतूद आहे. या प्रकरणातही योग्य त्या तरतुदींनुसार कारवाई केली जाईल,' असे ते म्हणाले.

या चर्चेत हस्तक्षेप करत विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी सरकारला या प्रकरणाची पूर्ण माहिती घेण्याचे आणि प्रथमदर्शनी गुन्हा घडल्याचे दिसत असतानाही अद्याप कोणालाही अटक का करण्यात आली नाही, याचे स्पष्टीकरण सभागृहाला देण्याचे निर्देश दिले. काँग्रेसचे आमदार विकास ठाकरे यांनी 'विधान भवन परिसरातील अन्नाच्या स्वच्छतेबाबत' चिंता व्यक्त केली. काँग्रेस विधिमंडळ पक्षाच्या कार्यालयात वाढलेल्या जेवणाच्या ताटात माशी आढळल्याचा दावा त्यांनी केला. सर्व २८८ आमदार विधान भवन परिसरातच जेवण करतात. येथे वाढले जाणारे अन्न सुरक्षित आणि दर्जेदार असायला हवे, असे आमदार विकास ठाकरे यांनी स्पष्ट केले आहे.

तूप भेसळ कंपन्यांची विक्री केंद्रे बंद तूप भेसळीत गुंतलेल्या कंपन्यांची किरकोळ विक्री केंद्रे त्वरित बंद केली जातील आणि त्यांचे परवाने रद्द केले जातील. तपास आणि प्रयोगशाळेच्या अहवालानंतर आवश्यक असल्यास संबंधितांना अटकही केली जाईल, असे ते म्हणाले आहे.

# शिक्षक बदलीसाठी नियमावली तयार करणार

## मंत्री जयकुमार गोरे यांची घोषणा

■ (प्रतिनीधी वरुड दर्पण)



**मुंबई** – शाळा सुरू होण्यापूर्वीच शिक्षकांची पदोन्नती, समायोजन आणि बदली प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी नवीन नियमावली तयार करणार असल्याची माहिती ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी विधानसभेत दिली. विधानसभा सदस्य श्रीजया चव्हाण यांनी उपस्थित केलेल्या लक्षवेधीला उत्तर देताना ते बोलत होते. मंत्री गोरे म्हणाले की, अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन करण्यापूर्वी पदोन्नतीची प्रक्रिया पूर्ण करणे आवश्यक आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार शिक्षक पदोन्नतीसाठी टीईटी उत्तीर्ण असणे अनिवार्य आहे. टीईटी संदर्भातील अनेक प्रकरणे उच्च न्यायालय आणि सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असल्याने पदोन्नती आणि त्यानंतरची समायोजन प्रक्रिया विलंबाने होत आहे. सध्या संबंधित जिल्हा परिषदांमध्ये प्रथम मुख्याध्यापक पदासाठी शिक्षकांच्या पदोन्नतीची प्रक्रिया राबविण्यात येत आहे. त्यानंतर अतिरिक्त जागांवर अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन करण्यात येणार आहे.

जिल्हास्तरीय व तालुकास्तरीय अतिरिक्त शिक्षक समायोजनाचे अधिकार १८ मे २०११ च्या शासन निर्णयानुसार मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे आहेत. त्यामुळे संबंधित मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन लवकर करण्याच्या सूचना देण्यात येईल.

बदलीची प्रक्रिया क्लिष्ट शिक्षक बदलीची सध्याची प्रक्रिया क्लिष्ट झाली आहे. या संदर्भातील शेकडो शासन निर्णयांमुळे प्रक्रिया अनेक टप्प्यांत ऑक्टोबरपर्यंत सुरू राहते. यात सुधारणा करण्याची आवश्यकता असून, शासन यासाठी सर्वसमावेशक नियमावली तयार करणार आहे. शाळा सुरू होण्यापूर्वीच शिक्षकांची पदोन्नती, अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन आणि बदली प्रक्रिया पूर्ण होईल, यासाठी शासन आवश्यक कार्यवाही करणार असल्याचे ग्रामविकास मंत्री गोरे यांनी सांगितले.

# राज्य सरकारवर 'सर्वोच्च' ताशेरे

■ (प्रतिनीधी वरुड दर्पण)



**नवी दिल्ली** – एका खून प्रकरणाच्या खटल्यातील अत्यंत संथ गतीबद्दल सर्वोच्च न्यायालयाने शुक्रवारी महाराष्ट्र सरकारला चांगलेच धारेवर धरले. राज्य सरकार आरोपींच्या जामीन अर्जांना नेहमीच विरोध करते, परंतु फौजदारी खटल्यांचे कामकाज जलद गतीने चालवण्यास अपयशी ठरते, असे स्पष्ट निरीक्षण न्यायालयाने यावेळी नोंदवले.

न्या.अहसानुद्दीन अमानुल्लाह आणि न्या. शील नागू यांच्या खंडपीठाने केल्विन चिंदोजी ओकोरो या परदेशी नागरिकाच्या जामीन अर्जावर सुनावणी करताना हे महत्त्वपूर्ण निरीक्षण नोंदवले. ओकोरो हा २०२२ मधील एका अपहरण, खून आणि दंगलीच्या प्रकरणातील आरोपी आहे.

केवळ २ साक्षीदारांची तपासणी या टप्प्यावर आरोपीला जामीन देण्यास खंडपीठाने नकार दिला असला, तरी आरोपी गेल्या चार वर्षांहून अधिक काळ कोठडीत असल्याबद्दल न्यायालयाने तीव्र चिंता व्यक्त केली. धक्कादायक बाब म्हणजे, या संपूर्ण कालावधीत एकूण ४५ फिर्यादी साक्षीदारांपैकी केवळ दोनच साक्षीदारांची तपासणी पूर्ण झाली आहे. ओकोरो याला ७ मे २०२२ रोजी अटक करण्यात आली होती.

# बेस्टचे अपघात सत्र थांबेना : अंधेरीत बसची १४ वाहनांना धडक

## दोघे जखमी, बसचालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याचा प्राथमिक अंदाज

■ (प्रतिनीधी वरुड दर्पण)



**मुंबई** – गेल्या काही दिवसांत 'बेस्ट' बसच्या अपघातांचे सत्र थांबण्याचे चिन्ह दिसत नाही. शुक्रवारी दुपारी अंधेरी परिसरात 'बेस्ट'च्या भाडेतत्त्वावरील बसच्या चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने बसने तब्बल १४ वाहनांना धडक दिली. या अपघातात दोन जण जखमी झाले आहेत. गेल्या दोन दिवसांतील 'बेस्ट' बसची ही दुसरी मोठी दुर्घटना आहे. बेस्ट उपक्रमाच्या ताफ्यात भाडेतत्त्वावरील बसेसचे अपघात होण्याचे प्रमाण वाढले आहे. या अपघातात एक जण जखमी झाल्याची घटना ताजी असतानाच शुक्रवारी अंधेरी सबवेजवळील एस. व्ही. रोडच्या दक्षिण वाहिनी मार्गावर पुन्हा बेस्ट बसचा अपघात झाला. मिल्लत नगर ते अंधेरी (पश्चिम) बसस्थानक या मार्गावरील क्रमांक २४२ ची बस सीझर रोडवरून उजवीकडे वळत असताना चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने हा भीषण अपघात झाला.

# ५ कोटींचं आमिष, 'ऑपरेशन टायगर'च्या वावड्या उठताच उद्धव ठाकरेंची मोठी ॲक्शन, खास शिलेदाराला तडकाफडकी नाशिकला पाठवलं

■ (प्रतिनिधी वरुड दर्पण)



**मुंबई** – महाराष्ट्राच्या राजकीय वतुर्ळात सध्या सर्वाधिक चर्चेत असलेल्या 'ऑपरेशन टायगर'चे जोरदार हादरे आता नाशिकमध्ये बसू लागले आहेत. नाशिक महानगरपालिकेतील उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेचे १० ते १२ नगरसेवक एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेच्या गळाला लागल्याच्या वावड्या उठल्या आहेत. या संपूर्ण पार्श्वभूमीवर आता उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेचे संपर्कप्रमुख रवींद्र मिर्लेकर हे तातडीने नाशिकमध्ये दाखल झाले असून, आज त्यांनी पदाधिकारी आणि नगरसेवकांची अत्यंत महत्वाची आढावा बैठक बोलावली आहे. ५ कोटींचे आमिष आणि 'त्या' वकिलाचा गेम प्लॅन? या सर्व प्रकरणाला तेव्हा गंभीर वळण मिळाले, जेव्हा ठाकरेंच्या शिवसेनेचे गटनेते केशव पोरजे यांनी पत्रकार परिषदेत एक खळबळजनक आरोप केला.

# राज्य सरकारचे अर्थसंकल्पबाह्य कर्ज २८,३२५ कोटी रुपयांवर

## राज्य वित्त लेखा परीक्षण अहवालात ठपका

■ (प्रतिनीधी वरुड दर्पण)




**मुंबई** – महाराष्ट्राचे अर्थसंकल्पबाह्य कर्ज २८,३२५ कोटी रुपयांवर पोहोचले असून, या दायित्वांचा राज्याच्या अर्थसंकल्पीय दस्तावेजांमध्ये किंवा खात्यांमध्ये पारदर्शकपणे उल्लेख केलेला नाही. यामुळे राज्यावरील प्रत्यक्ष कर्जाचा बोजा कमी दाखवला गेला असून कायदेमंडळाच्या देखरेखीवर मर्यादा आल्या आहेत, असे २०२४-२५ च्या राज्य वित्त लेखापरीक्षण अहवालात म्हटले आहे.

अर्थसंकल्पात उघड न करता अशी दायित्वे निर्माण करणे पारदर्शकता आणि आंतर-पिढ्यानपिढ्यांमधील समानतेच्या दृष्टीने चिंतेची बाब आहे, असे या अहवालात नमूद करण्यात आले आहे. २०२४-२५ या काळात एकनाथ शिंदे हे मुख्यमंत्री होते. नोव्हेंबर २०२४ मध्ये विधानसभा निवडणुका झाल्या आणि शिंदे यांच्या सरकारमध्ये अर्थमंत्री असलेले भाजप नेते देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री झाले. अर्थसंकल्पबाह्य कर्ज ही एक अशी वित्तपुरवठा पद्धत आहे ज्यामध्ये सरकार थेट कर्ज घेण्याऐवजी सार्वजनिक संस्था किंवा विशेष उद्देशीय वाहनांद्वारे खर्चासाठी निधी उभारते.

लेखापरीक्षण अहवालानुसार, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने राज्य सरकारच्या हमीवर हुडकोकडून २०२४-२५ मध्ये १८,४४० कोटी रुपये, २०२३-२४ मध्ये ७,७०० कोटी रुपये आणि २०२२-२३ मध्ये २,५०० कोटी रुपयांचे कर्ज घेतले होते.

# गारपीटग्रस्त अनुदानात वरुड तालुक्याचा समावेश करा

## कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती नरेंद्र पावडे यांची मागणी

■ (प्रतिनीधी वरुड दर्पण)



**वरुड** – राज्य शासनाने गारपीटग्रस्त तालुक्यांसाठी जाहीर केलेल्या मदत योजनेत वरुड तालुक्याचा समावेश करण्यात आलेला नसल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

वरुड तालुक्याचाही गारपीटग्रस्त म्हणून समावेश करुन बाधित शेतकऱ्यांना तात्काळ आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती नरेंद्र उर्फ बबलू पावडे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

या निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, मे २०२६ मध्ये वरुड तालुक्यात मोठ्या प्रमाणावर गारपीट झाली होती. या नैसर्गिक आपत्तीमुळे आंबिया बहारातील संत्रा व मोसंबी पिकांचे मोठे नुकसान झाले.

गारांच्या तडाख्यामुळे फळांची मोठ्या प्रमाणात गळ झाली, तर झाडावरील फळांवर काळे डाग पडल्याने त्यांची बाजारपेठेतील गुणवत्ता घसरली आहे. परिणामी व्यापारीही ही फळे खरेदी करण्यास टाळाटाळ करत असल्याने उत्पादक शेतकऱ्यांना मोठा आर्थिक फटका बसला आहे. यापूर्वी एप्रिल व मे २०२६ या कालावधीत वरुड तालुक्यात तीव्र उष्णतेची लाट आली होती. वाढत्या तापमानामुळेही संत्रा व मोसंबी पिकांचे नुकसान झाले. सलग नैसर्गिक संकटांचा सामना करावा लागल्याने तालुक्यातील शेतकरी आर्थिक अडचणीत सापडले असून हवालदिल झाले आहेत. गारपिटीनंतर कृषी विभाग व तहसील प्रशासनाने पंचनामे करुन शासनाकडे सविस्तर अहवाल सादर केला आहे. या अहवालानुसार वरुड तालुक्यातील २४ हजार ७७३ शेतकरी बाधित झाले असून २८ हजार ४४५ हेक्टर क्षेत्राचे नुकसान झाल्याची नोंद आहे. तरीही शासनाच्या गारपीटग्रस्त तालुक्यांच्या यादीत वरुडचा समावेश करण्यात आलेला नाही, अशी खंत निवेदनात व्यक्त करण्यात आली आहे.

दरवर्षी नैसर्गिक आपत्तींचा सामना करणाऱ्या वरुड तालुक्यातील शेतकऱ्यांना न्याय देण्यासाठी शासनाने तातडीने वरुड तालुक्याचा गारपीटग्रस्त तालुक्यांमध्ये समावेश करुन आर्थिक मदत जाहीर करावी, अशी मागणी नरेंद्र उर्फ बबलू पावडे यांनी केली आहे.

# राज्यस्तरीय तायकांडो स्पर्धेत जागृत इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थ्यांची सुवर्णमय यश

■ (प्रतिनीधी वरुड दर्पण)




**वरुड** – अहिल्यानगर येथील जिल्हा क्रीडा संकुलात ३ ते ५ जुलै या कालावधीत पार पडलेल्या राज्यस्तरीय तायकांडो स्पर्धेत जागृत इंग्लिश प्रायमरी ॲंड हायर प्रायमरी स्कूलच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन करत दोन सुवर्णपदके पटकावली व त्यांची राष्ट्रीय स्पर्धेकरीता निवड झाली आहे.

शाळेचे विद्यार्थी संकल्प आडे आणि ओजस घ्यार यांनी उत्कृष्ट तांत्रिक कौशल्य आत्मविश्वास आणि जिद्दीच्या बडावर प्रतिस्पर्ध्यांवर मात करत सुवर्णपदकावर आपले नाव कोरले त्यांचे या शानदार यशामुळे शाळेचा तसेच वरुड शहराचा गौरव वाढला आहे.

या यशामागे प्रशिक्षक क्रिष्णा मिश्रा यांचे सातत्यपूर्ण मार्गदर्शन आणि विद्यार्थ्यांची कठोर मेहनत मोलाची ठरली. विद्यार्थ्यांच्या या उल्लेखनीय कामगिरीबद्दल जागृत नवयुवक शिक्षण संस्थेचे पदाधिकारी मनोज गुल्हाने, शैलेश देशमुख, मुख्याध्यापिका पूजा मांडवगडे, पर्यवेक्षिका धनश्री लाडोळे यांनी विजेत्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन करुन त्यांना राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या, तसेच शाळेतील शिक्षक, पालकांनी विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल आनंद व्यक्त करत त्यांचे कौतुक केले.

# संपादकीय

**आलिया भोगासी करावे सादर,
देवाचिये घर न चुकवी हा.**

## शहर घडविण्याची सामूहिक जबाबदारी

शहराचा विकास हा केवळ रस्ते, पूल, इमारती किंवा उंचच उंच इमारतींनी मोजला जात नाही. एखाद्या शहराची खरी प्रगती तेथील नागरिकांचे जीवनमान, मूलभूत सुविधा, स्वच्छता, वाहतूक व्यवस्था, सुरक्षितता, पर्यावरण आणि प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर अवलंबून असते. त्यामुळे शहराचा विकास हा एकतर्फी प्रयत्नांनी कधीच शक्य होत नाही. प्रशासनाची कार्यक्षमता, लोकप्रतिनिधींची बांधिलकी आणि नागरिकांची जबाबदारी या तिन्ही घटकांचा समन्वय झाला तरच शहर सर्वांगीण प्रगतीच्या मार्गावर वाटचाल करू शकते. आज अनेक शहरे वेगाने विस्तारत आहेत. लोकसंख्या वाढत आहे, नवीन वसाहती निर्माण होत आहेत, उद्योग-व्यवसाय वाढत आहेत. मात्र या वाढीबरोबरच वाहतूक कोंडी, प्रदूषण, पाणीटंचाई, कचरा व्यवस्थापन, अतिक्रमण आणि अनियोजित बांधकाम यांसारख्या समस्या निर्माण होत आहेत. या समस्यांवर मात करण्यासाठी केवळ सरकारकडे किंवा महानगरपालिका, नगरपरिषद यांच्याकडे बोट दाखवून उपयोग नाही. प्रत्येक घटकाने आपली भूमिका जबाबदारीने पार पाडणे आवश्यक आहे. प्रशासन हे शहराच्या विकासाचा कणा असते. शहर नियोजन, रस्ते, पाणीपुरवठा, सांडपाणी व्यवस्था, आरोग्य सेवा, शिक्षण, सार्वजनिक वाहतूक, उद्याने आणि इतर मूलभूत सुविधांची जबाबदारी प्रशासनावर असते. प्रशासन पारदर्शक, उत्तरदायी आणि कार्यक्षम असेल तर विकासकामांना गती मिळते. निधीचा योग्य वापर होतो, भ्रष्टाचाराला आळा बसतो आणि नागरिकांचा विश्वास वाढतो. मात्र प्रशासन सुस्त किंवा भ्रष्ट असेल तर विकासाची गती मंदावते आणि नागरिकांना त्रास सहन करावा लागतो. लोकप्रतिनिधी हे जनतेचे प्रतिनिधी म्हणून निवडून दिले जातात. निवडणुकीत दिलेली आश्वासने पूर्ण करणे, जनतेच्या समस्या शासनापर्यंत पोहोचवणे, विकासासाठी निधी उपलब्ध करून देणे आणि प्रशासनावर योग्य नियंत्रण ठेवणे ही त्यांची जबाबदारी असते. अनेकदा विकासकामांचे राजकारण केले जाते. पक्षीय मतभेदांमुळे अनेक महत्त्वाचे प्रकल्प रखडतात. विकासासाठी राजकारण नव्हे तर लोककारण आवश्यक आहे. जनहिताला प्राधान्य देणारे लोकप्रतिनिधी शहराला प्रगतीच्या दिशेने घेऊन जाऊ शकतात. मात्र शहराच्या विकासात सर्वात महत्त्वाची भूमिका नागरिकांची असते. स्वच्छता राखणे, कर वेळेवर भरणे, वाहतुकीचे नियम पाळणे, सार्वजनिक मालमत्तेचे संरक्षण करणे, पाणी आणि वीज यांचा काटकसरीने वापर करणे, झाडे लावणे, प्लास्टिकचा वापर कमी करणे आणि सामाजिक उपक्रमांमध्ये सहभागी होणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे. अनेकदा आपण प्रशासनाकडून अपेक्षा ठेवतो; पण स्वतःची कर्तव्ये विसरतो. रस्त्यावर कचरा टाकणारा, सार्वजनिक ठिकाणी घाण करणारा किंवा नियम मोडणारा नागरिक शहराच्या विकासात अडथळाच निर्माण करतो.

## राशिभविष्य

**मेष :** कामात नवी संधी मिळू शकते. आर्थिक व्यवहार काळजीपूर्वक करा. कुटुंबात आनंदाचे वातावरण राहील. आरोग्याकडे लक्ष द्या.

**वृषभ :** संयमाने घेतलेले निर्णय लाभदायक ठरतील. खर्चावर नियंत्रण ठेवा. जोडीदाराचे सहकार्य मिळेल. प्रवासाची शक्यता आहे.

**मिथुन :** नवीन ओळखी उपयुक्त ठरतील. व्यवसायात प्रगतीची चिन्हे दिसतील. विद्यार्थ्यांसाठी दिवस अनुकूल आहे. आत्मविश्वास वाढेल.

**कर्क :** भावनिक निर्णय टाळा. नोकरीत जबाबदारी वाढेल. घरातील ज्येष्ठांचा सल्ला घ्या. आरोग्याची काळजी घ्या.

**सिंह :** नेतृत्वगुणांना वाव मिळेल. रखडलेली कामे पूर्ण होतील. आर्थिक स्थितीत सुधारणा होईल. मित्रांची साथ लाभेल.

**कन्या :** नियोजनामुळे यश मिळेल. अनावश्यक वाद टाळा. उत्पन्नाचे नवीन मार्ग सापडतील. मन प्रसन्न राहील.

**तूळ :** भागीदारीत लाभ होण्याची शक्यता. कुटुंबासाठी वेळ द्या. कामात कौतुक मिळेल. वाहन चालवताना सावध राहा.

**वृश्चिक :** मेहनतीचे चांगले फळ मिळेल. आर्थिक लाभाची शक्यता आहे. प्रेमसंबंध अधिक दृढ होतील. आत्मविश्वास कायम ठेवा.

**धनू :** प्रवासातून फायदा होईल. नवीन योजना सुरू करण्यास योग्य वेळ. वरिष्ठांचे सहकार्य मिळेल. आरोग्य चांगले राहील.

**मकर :** कामाचा ताण वाढू शकतो. खर्चाचे नियोजन आवश्यक आहे. कुटुंबीयांचा पाठिंबा मिळेल. संयमाने वागा.

**कुंभ :** सर्जनशील कल्पनांना यश मिळेल. आर्थिक व्यवहारात लाभ होईल. मित्रांसोबत आनंददायी वेळ जाईल. नवीन संधींचा लाभ घ्या.

**मीन :** मनातील चिंता कमी होईल. व्यवसायात प्रगतीची शक्यता. कुटुंबात शुभ वार्ता मिळू शकते. सकारात्मक विचार लाभदायक ठरतील.

## गुगल ट्रेंड्स

- फिफा वर्ल्डकप स्पर्धेतून पराभवामुळे जर्मनीचा संघ बाहेर पडल्याची बातमी ट्रेंडिंग होती.
- सोन्याच्या दराची बातमी चर्चेत होती.
- युरोपमधील हीट वेव्हच्या बातम्या ट्रेंडिंग होत्या
- महिला टी-२० वर्ल्डकपच्या बातम्या चर्चेत होत्या.

# डेटा सेंटरची दुसरी काळीकुट्ट बाजू



तेलंगणाचा रंगारेड्डी जिल्हा. जमिनींचे माहेरघर. येथील कोकापेट, नरसिंगी, मेकागुडा, शमशाबाद यांसारख्या ग्रामीण भागांत एकेकाळी भात आणि कापसाची पिके डोलत होती. सुमारे ४-५ वर्षांपूर्वीपर्यंत या जमिनीचा भाव १ ते ३ कोटी रुपये प्रति एकर होता, पण या जमिनी आता राज्याची डिजिटल इकॉनॉमी बनल्या आहेत. तंत्रज्ञानाच्या नव्या पर्वाची साक्ष देणारी कोकापेटमधील जमीन आता १३७ ते १५१ कोटी रुपये प्रति एकर दराने विकली जात आहे. शमशाबाद कॉरिडोअरमध्ये जमिनीच्या किमती २५ कोटी रुपयांच्या पुढे गेल्या आहेत. नरसिंगीमधील प्रमुख ठिकाणी जमिनीचे दर ३० ते ७० कोटी रुपये प्रति एकरपर्यंत पोहोचले आहेत.

जमिनीच्या वाढत्या किमतीमागचे कारण आहे डेटा सेंटर्स. आज या गावांमध्ये विशाल डेटा सेंटर्स, सर्व्हर फार्म आणि काचेच्या चकचकीत इमारती उभ्या राहत आहेत. रंगारेड्डी जिल्हा मुंबईनंतर देशातील दुसरे सर्वात मोठे डेटा सेंटर केंद्र बनणार आहे. 'मायक्रोसॉफ्ट' कंपनी या वर्षी आपले 'इंडिया साऊथ सेंट्रल क्लाऊड रीजन' येथेच सुरू करणार आहे. त्यामुळे येथील जमीन कोट्यवधीच्या घरात गेली आहे. भूमाफिया आणि दलालांनी यापूर्वीच शेतकऱ्यांकडून लाखाच्या भावाने जमिनी खरेदी केल्या, आज त्या जमिनीचा भाव कोट्यवधीच्या घरात आहे. ज्या शेतकऱ्यांनी आपल्या जमिनी दिल्या, त्यांच्याकडे आता ना शेती उरली आहे ना कोणताही व्यवसाय किंवा कामधंदा. चंदनवल्ली गावचे शेतकरी मल्लेशम गौड यांनी ३ एकर जमीन विकली होती. त्या पैशातून पक्के घर बांधले. मुलांचे लग्न केले. पण, आता आमच्याकडे उपजीविकेचे कोणतेही साधन नाही. मेकागुडाच्या माजी सरपंच के. लक्ष्म्मा सांगतात की, सरकारने जमिनी तर घेतल्या, पण आमच्या तरुणांना फक्त सिक्युरिटी गार्डचे काम मिळाले. हैदराबाद येथे ९.६ मेगावॉटचे डेटा सेंटरचे काम सुरू आहे, जे रंगारेड्डी जिल्ह्याला लागून आहे.

तेलंगणामध्ये जिथे सुपीक जमीन होती, तिथे डेटा सेंटर्स सुरू होत आहेत. (५ जुलै २०२६ ची बातमी) महाराष्ट्रातील पुणे, रायगड, रत्नागिरी जिल्ह्यात अशी परिस्थिती निर्माण झाली होती. शेतकऱ्यांचे उत्पन्नाचे साधन संपल्याने त्यांच्या उपजीविकेचा प्रश्न निर्माण झाला होता, त्यावर 'मुळशी पॅटर्न' हा मराठी चित्रपटसुद्धा निर्माण निर्माण झाला. भूमाफिया, दलाल, कंत्राटदार आणि राजकीय नेते जमिनीच्या व्यवहारातून कोट्यवधी रुपये कसे जमा करतात हे यानिमित्ताने जगासमोर आले होते. भारतात २५० कृत्रिम बुद्धिमत्ता डेटा सेंटर निर्माण होत असल्याचे वृत्त काही दिवसांपूर्वी आले. ज्या ठिकाणी हे डेटा सेंटर निर्माण होणार आहेत तेथील जमिनीचे भाव कोट्यवधीच्या घरात गेलेत.

'रिलायन्स' आणि 'मेटा' यांची मोठी भागीदारी असणारे १६८ मेगावॉट क्षमतेचे अवाढव्य अख-सक्षम डेटा सेंटर गुजरातमधील जामनगर येथे उभारणार आहेत. हे मेटाचे भारतातील पहिलेच 'बिल्ट-टू-सूट' केंद्र असून, भारत सरकारने डेटा सेंटर्सना धोरणात्मक राष्ट्रीय पायाभूत सुविधांचा दर्जा दिला असल्याने या प्रकल्पाला सरकारी धोरणांचेही मोठे पाठबळ मिळत आहे. याचा अर्थ पाणी, वीज मोफत देण्यासोबत सरकारी टॅक्स नसेल.

या सेंटरमधील महाकाय सर्व्हर्स आणि एआय कॉम्प्युटर्सला थंड ठेवण्यासाठी लाखो गॅलन पाणी लागणार आहे, त्यावर समाजमाध्यमांवर शेकडो वेगवेगळ्या बातम्या आणि व्हिडीओ आहेत.

याशिवाय एक ऊर्जा कंपनी भारतात विविध ठिकाणी डेटा सेंटर उभारत आहे. छत्तीसगड येथे देशातील पहिले एआय आधारित डेटा सेंटर पार्क सुरू करण्यात आले असून नवी मुंबई येथे 'योट्टा'चे मोठे हायपरस्केल एआय-रेडी डेटा सेंटर, चेन्नई आणि मुंबईमध्ये 'इक्विनिक्स'ने एआयसाठी अनुकूल डेटा सेंटर्स सुरू केली आहेत. पुणे, बंगळुरू आणि हैदराबाद या शहरांमध्ये 'एसटीटी जीडीसी' आणि 'सीटीआरएल एस' मोठ्या प्रमाणावर एआय सेंटर्सचा विस्तार करत आहेत. या सर्व डेटा सेंटरला मोठ्या प्रमाणात वीज आणि पाणी लागणार आहे.

**बदलत्या आधुनिक तंत्रज्ञानामुळे आणि कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे तर माणूस केवळ शरीराने नव्हे तर मेंदू आणि विचाराने सामाजिक व्यवस्थेतून हद्दपार होतो की काय, अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. अशावेळी महाकाय डेटा सेंटरची उभारणी करताना पर्यावरणीय प्रश्नांकडे गांभीर्याने लक्ष द्यायला हवे.**

डेटा सेंटर म्हणजे खूप मोठ्या कॉम्प्युटर्सचे (सर्व्हर्सचे) मोठे घर असते. एआयला खूप मोठा डेटा आणि गणितीय प्रक्रिया करावी लागते. ही प्रक्रिया करण्यासाठी लागणारे हाय-स्पीड सर्व्हर्स, वीज आणि थंड ठेवणारी यंत्रणा या डेटा सेंटर्समध्ये असावी लागते.

डेटा सेंटरमुळे पिण्याच्या पाण्याचा ताण नक्कीच वाढू शकतो. या सेंटरमधील संगणक सर्व्हर २४ तास चालतात आणि खूप गरम होतात. त्यांना थंड ठेवण्यासाठी लाखो लिटर पाण्याची गरज असते. हे पाणी बाष्पीभवन प्रक्रियेद्वारे हवेत उडून जाते. २०३० पर्यंत कृत्रिम बुद्धिमत्ता डेटा सेंटर्ससाठी दरवर्षी सुमारे ९.३ ट्रिलियन लिटर पाणी लागेल, असा अंदाज युनायटेड नेशन्सच्या अहवालात वर्तवण्यात आला आहे, हे जगात अनेक ठिकाणी दुष्काळ करण्यास पुरेसे आहे. एका अहवालानुसार, भारतामध्ये २०३० पर्यंत डेटा सेंटर्सचा पाण्याचा वापर ३५८ अब्ज लिटरपर्यंत पोहोचू शकतो. भारतात जगाच्या लोकसंख्येपैकी १८ टक्के लोक राहतात, पण पिण्याच्या पाण्याचे साठे मात्र केवळ ४ टक्केच आहेत. महाराष्ट्रात पुणे आणि मुंबईसारख्या मोठ्या शहरांमध्ये डेटा सेंटर्स आहेत. जिथे आधीच पिण्याच्या पाण्याची कमतरता आहे, तिथे हे अतिरिक्त पाणी वापरले तर स्थानिक पातळीवर पिण्याच्या पाण्याच्या स्रोतांवर मोठा ताण येऊ शकतो. म्हणूनच, इंडियाना किंवा इतर ठिकाणी नागरिकांकडून यावर प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

पर्यावरणीय प्रश्नांच्या निर्मितीबरोबरच सामाजिक प्रश्नसुद्धा यातून निर्माण होतील. सुपीक जमिनीतून निघणारे अन्नधान्याचे उत्पादन घटून परावलंबित्व वाढते, शिवाय शेतकऱ्यांचा सामाजिक व आर्थिक स्तरसुद्धा खालावतो.

डेटा सेंटरमुळे रोजगार वाढतील असा दावा केला जात असला तरी प्रत्यक्षात मात्र तसे घडताना दिसत नाही.

'अमेरिकेत अख, यांत्रिकीकरण आणि आऊटसोर्सिंगमुळे विषमता किती वाढली ते बघा. २००३-२०१२ सालांदरम्यान तिथल्या बॅचलर डिग्री असलेल्या तरुणांना मिळणारे उत्पन्न ५२ हजार डॉलरपासून ४६ हजार डॉलरपर्यंत खाली उतरले. पण त्यांच्यावरचे कर्ज (ींींविशर्पी श्रेरप) मात्र तिपटीने वाढले! आणि हीच प्रक्रिया पुढे आणखीन जोराने चालू आहे. बेकारीचे एक उत्तम उदाहरण २०१३ साली 'न्यूयॉर्क टाइम्स'च्या एका बातमीरूपात छापून आले होते. दक्षिण कॅलिफोर्नियामधला 'पार्कडेल मिल्स' नावाचा एक कापड कारखाना (टेक्स्टाईल इंडस्ट्री) आहे. तिथे १९८० सालच्या सुमारास किमान २००० कामगार काम करायचे. २०१३ साली ही संख्या १४० वर घसरली. इथे सगळी कामे यंत्र करतात. फक्त काही कामांना मात्र माणसेच बरी पडतात. म्हणून १४० कामगार २०१३ सालापर्यंत तिथे टिकले होते. ३ऊ प्रिंटिंगमुळे अमेरिकेतल्या तब्बल १०% लोकांकडचे कामच गेले आहे. ही टक्केवारी वाढतच जाईल. अमेरिकेत जवळपास ६० लाख, तर जगभरात ११ कोटी लोक बांधकाम व्यवसायाशी जोडले गेले आहेत. ३ऊ प्रिंटिंगच्या मदतीने बांधकामे करता यायला लागल्यामुळे त्यांच्यावर बेकारीचे संकट उभे राहील'.

(आर्टिफिशियल इंटेलिजन्स : अच्युत गोडबोले, बुकगंगा पब्लिकेशन पुणे) याचा अर्थ यांत्रिकीकरण करू नये असा नव्हे, परंतु यांत्रिकीकरणामुळे माणूस वजा होऊ नये. तर यंत्राच्या मदतीने माणसाचे श्रम कमी व्हावेत असा त्याचा अर्थ होतो. बदलत्या आधुनिक तंत्रज्ञानामुळे आणि कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे तर माणूस केवळ शरीराने नव्हे तर मेंदू आणि विचाराने सामाजिक व्यवस्थेतून हद्दपार होतो की काय, अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. अशावेळी महाकाय डेटा सेंटरची उभारणी करताना पर्यावरणीय आणि सामाजिक प्रश्नांकडे तेवढेच गांभीर्याने लक्ष देणे गरजेचे ठरणार आहे .महाराष्ट्रातील पुणे, रायगड, रत्नागिरी जिल्ह्यात अशी परिस्थिती निर्माण झाली होती. शेतकऱ्यांचे उत्पन्नाचे साधन संपल्याने त्यांच्या उपजीविकेचा प्रश्न निर्माण झाला होता, त्यावर 'मुळशी पॅटर्न' हा मराठी चित्रपटसुद्धा निर्माण निर्माण झाला.

भारतात २५० कृत्रिम बुद्धिमत्ता डेटा सेंटर निर्माण होत असल्याचे वृत्त काही दिवसांपूर्वी आले. ज्या ठिकाणी हे डेटा सेंटर निर्माण होणार आहेत तेथील जमिनीचे भाव कोट्यवधीच्या घरात गेलेत. पर्यावरणीय प्रश्नांच्या निर्मितीबरोबरच सामाजिक प्रश्नसुद्धा यातून निर्माण होतील. सुपीक जमिनीतून निघणारे अन्नधान्याचे उत्पादन घटून परावलंबित्व वाढते, शिवाय शेतकऱ्यांचा सामाजिक व आर्थिक स्तरसुद्धा खालावतो.

# डॉ. सय्यद नासीर हुसेन : राज्यसभेतील सक्रिय खासदार

डॉ. सय्यद नासीर हुसेन हे भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे वरिष्ठ नेते आणि कर्नाटकातून राज्यसभेचे खासदार आहेत. ते काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय प्रवक्ते म्हणूनही कार्यरत असून संसदीय चर्चांमध्ये सक्रिय सहभागासाठी ओळखले जातात.

शिक्षण, सामाजिक न्याय, संविधानिक मूल्यांचे संरक्षण, अल्पसंख्याकांचे प्रश्न आणि लोकशाही संस्थांच्या बळकटीकरणावर ते सातत्याने भूमिका मांडतात. विविध राष्ट्रीय आणि सार्वजनिक धोरणांवर ते आपले मत मांडत असतात. राज्यसभा सदस्य म्हणून ते जनहिताच्या विषयांवर प्रश्न उपस्थित करणे, धोरणांवर चर्चा करणे आणि संसदीय समित्यांमध्ये योगदान देणे यासाठी परिचित आहेत. डॉ. सय्यद नासीर हुसेन हे विविध संसदीय समित्यांमध्ये कार्यरत राहून धोरणात्मक




विषयांवर अभ्यासपूर्ण मते मांडत असतात. शिक्षण, रोजगार, सामाजिक समता, आर्थिक विकास आणि संघराज्य व्यवस्थेशी संबंधित मुद्द्यांवर ते संसदेत सातत्याने आवाज उठवतात. विविध सामाजिक आणि सार्वजनिक कार्यक्रमांमध्ये सहभाग घेऊन जनतेशी संवाद साधणे आणि त्यांच्या समस्या शासनापर्यंत पोहोचविण्यासाठी ते सक्रियपणे कार्यरत असतात.

# प्रामाणिकपणाचे फळ

**✻ ज्ञानकोषी बोध**

एका गावात दोन मित्र राहत होते. एकाचे नाव रोहन आणि दुसऱ्याचे नाव सोहन. एके दिवशी दोघांना रस्त्यावर पैशांनी भरलेले एक पाकीट सापडले. सोहन म्हणाला, 'हे पैसे आपण ठेवून घेऊ.' पण रोहन म्हणाला, 'हे पैसे आपले नाहीत. ज्यांचे आहेत त्यांनाच परत केले पाहिजेत.'



दोघांनी पाकिटात असलेला पत्ता पाहिला आणि त्या व्यक्तीच्या घरी जाऊन पाकीट परत केले. पाकीट हरवलेल्या वृद्धाला ते पाहून खूप आनंद झाला. त्याने दोघांचे मनापासून आभार मानले आणि त्यांच्या प्रामाणिकपणाचे कौतुक करत त्यांना बक्षीस दिले.

घरी परतताना सोहन म्हणाला, 'आज मला समजले की, चुकीच्या मार्गाने मिळणारा पैसा क्षणिक असतो; पण प्रामाणिकपणाने मिळणारा सन्मान आयुष्यभर साथ देतो.'

**बोध :** प्रामाणिकपणा हीच माणसाची खरी संपत्ती आहे. प्रामाणिक व्यक्तीला समाजात नेहमीच आदर, विश्वास आणि यश मिळते.

वरुड दर्पण हे पत्र संपादक, प्रकाशक, मालक चंद्रकांत भाऊरावजी भड यांनी माऊली मुद्राटेक, मुद्रक - चंद्रकांत भा.भड, जिजाऊ नगर, बस स्टॅन्ड रोड, वरुड जि.अमरावती येथे छापून वरुड दर्पण कार्यालय, जिजाऊ नगर, बसस्टॅन्ड रोड, वरुड, ता.वरुड, जि.अमरावती येथुन प्रकाशित केले. (सर्व वाद वरुड न्यायालयाअंतर्गत सोडविले जातील.) मोबा.९४२२१५७७१२, ७७४५०६७७१२

**सोने-चांदीचे दर**

शुध्द सोने -९६१०८१० रु.(१०ग्रॅम)
२२.कॅ सोने - ९४,७०० रु.(१०ग्रॅम)
चांदी - १,३०,००० रु. (प्र.किलो)

**कृषी उत्पन्न बाजार समिती अमरावती**

**बाजारभाव ( क्विंटलमध्ये )**

| | | |
|---|---|---|
| ज्वारी - | १६५० - | २००० |
| गहू - | २५०० - | ३००० |
| तूर - | ६१०० - | ६३९० |
| मूग - | ६५०० - | ७००० |
| उडीद - | ६००० - | ७००० |
| हरभरा - | ५६०० - | ५९०० |
| सोयाबिन - | ४१०० - | ४३५० |
| बाजरा - | २००० - | २३०० |
| तिळ - | ८२०० - | ९३०० |
| भुईमूग - | ५१५० - | ५३५० |
| मका - | २२०० - | २३०० |

### नाशिकमध्ये 'ऑपरेशन टायगर'ची चर्चा

## उबाठा गटातील नगरसेवकांच्या पक्षांतराच्या चर्चांना उधाण

(प्रतिनीधी वरूड दर्पण)



***नाशिक*** – खासदारांच्या पक्षांतराच्या चर्चांनंतर आता नाशिक महापालिकेतील शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटाच्या डझनभर नगरसेवकांच्या संभाव्य पक्षांतराच्या चर्चांनी राजकीय वतुर्ळात खळबळ उडवली आहे. हे नगरसेवक मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेत प्रवेश करण्याच्या तयारीत असल्याचा दावा केला जात असला, तरी या वृत्ताला उबाठा गटाकडून स्पष्टपणे फेटाळण्यात आले आहे. राजकीय वतुर्ळात सुरू असलेल्या चर्चेनुसार, प्रभागनिहाय विकासनिधीच्या माध्यमातून काही नगरसेवकांना आपल्या बाजूने वळिवण्याची रणनीती आखण्यात आल्याचे बोलले जात आहे. या संपूर्ण घडामोडींविषयी कमालीची गोपनीयता पाळली जात असून, भविष्यात या चर्चांना प्रत्यक्ष स्वरूप आल्यास ते उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेना (उबाठा) गटासाठी मोठा राजकीय धक्का ठरू शकतो, अशी चर्चा आहे. नाशिक महापालिका निवडणुकीत शिवसेना (उबाठा) गटाचे १५ नगरसेवक निवडून आले होते. सध्या महापालिकेत भाजप आणि शिवसेना (शिंदे गट) यांची संयुक्त सत्ता आहे.

### जनआरोग्य योजनेत गैरव्यवहार

## एसआयटी चौकशी होणार, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची घोषणा, विविध आरोग्य योजनांचा आढावा

(प्रतिनीधी वरूड दर्पण)



***मुंबई*** – महात्मा जोतिराव फुले जनआरोग्य योजनेतील कथित गैरव्यवहारप्रकरणी राज्य सरकारने कठोर भूमिका घेतली असून नाशिक जिल्ह्यातील घोटाळ्याच्या चौकशीसाठी विभागीय आयुक्त प्रवीण गेडाम यांच्या अध्यक्षतेखाली विशेष तपास पथक (एसआयटी) स्थापन करण्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी येथे केली. या तपास पथकात विविध विभागांतील तज्ज्ञांचा समावेश असेल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

मुख्यमंत्री फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली शुक्रवारी विधान भवनात एकत्रित आयुष्मान भारत-प्रधानमंत्री जनआरोग्य योजना आणि महात्मा जोतिराव फुले जनआरोग्य योजनेचा आढावा घेण्यात आला. या बैठकीत भाजपचे आमदार राहुल आहेर यांनी नाशिक जिल्ह्यात महात्मा जोतिराव फुले जनआरोग्य योजनेंतर्गत झालेल्या कथित गैरव्यवहाराची सविस्तर माहिती दिली. त्यावेळी बोलताना, गरीब आणि गरजू नागरिकांना दर्जेदार तसेच पारदर्शक आरोग्यसेवा उपलब्ध करून देणे ही शासनाची सर्वोच्च प्राथमिकता आहे. जनआरोग्य योजनांमध्ये कोणत्याही प्रकारचा गैरव्यवहार सहन केला जाणार नाही, असा इशारा फडणवीस यांनी दिला.

## सुपर स्पेशलिटी हॉस्पिटल अमरावती येथे आईने आपली किडनी देऊन वाचविले मुलाचे प्राण

(प्रतिनीधी वरूड दर्पण)



***अमरावती*** – येथे ७४ वी किडनी प्रत्यारोपण शस्त्रक्रिया पूर्ण करण्यात आली.

सदर रुग्ण हा काही महिन्यांपासून किडनी आजाराने त्रस्त असल्याने त्यासाठी बाहेर उपचार पद्धती चालू होती व काही महिन्यांपासून डायलिसिस करत होता.

तेव्हा डॉक्टरांनी रुग्णास व त्याच्या कुटुंबीयास किडनी प्रत्यारोपण विषयी माहिती दिली व विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय, अमरावती येथे आयुष्यमान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेच्या माध्यमातून होत असलेल्या यशस्वी व विनामूल्य शस्त्रक्रिया यासाठी रुग्ण विविध जिल्ह्यांमधून नव्हे तर इतर राज्यामधून सुद्धा येत असतात याविषयी महिती दिली.

तेव्हा आज रुग्णालयात झालेले ७४ वे किडनी प्रत्यारोपण, हे २० वर्षीय कार्तिक विजय अढाऊ यांची शस्त्रक्रिया यशस्वीरित्या पूर्ण करण्यात आली आहे. सदर रुग्ण हा रा.आडगाव बु., ता.तेल्हारा, जि.अकोला येथील रहिवासी असून मागील काही महिन्यांपासून डायलिसिस चालु होते.

मात्र डायलिसिस यावर दीर्घकाळ उपाय नसून व होणारा त्रास बघुन किडनी प्रत्यारोपण हा यावरील योग्य उपाय आहे, असे जेव्हा डॉक्टरांनी सांगितले त्यावेळी मुलाच्या पुढील भविष्याचा विचार करून आई राजश्री विजय अढाऊ (४६) यांनी आपली एक किडनी मुलगा कार्तिक ला देण्याचा निर्णय घेतला, व आपली एक किडनी कार्तिक ला देऊन त्याला नवीन जीवन दिले. आयुष्यमान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजने अंतर्गत शस्त्रक्रिया विनामुल्य करण्यात आली.

सुपर स्पेशलिटी हॉस्पिटल अमरावती येथील वैद्यकीय अधीक्षक डॉ.अमोल नरोटे व विशेष कार्य अधिकारी डॉ.मंगेश मेंढे यांच्या मार्गदर्शनाखाली नेफरोलॉजिस्ट डॉ.हितेश गुल्हाने, युरो सर्जन डॉ.राहुल पोटोडे, डॉ.विक्रम देशमुख, डॉ.प्रतिक चिरडे, डॉ.विशाल बाहेकर, डॉ.राहुल घुले, बधिरिकरण तज्ञ- डॉ.रोहित हातगावकर, डॉ.बालकृष्ण बागवाले, डॉ.अश्विनी मढावी, डॉ.शीतल सोळंकी, डॉ.विक्रांत कुळमेथे, डॉ.माधव ढोपरे, डॉ.नाहीद, डॉ.रमणीय, डॉ.उज्वल अभ्यंकर, डॉ.प्रियंका कांबळे, डॉ.श्रद्धा जाधव, समाजसेवा अधीक्षक (वैद्यकीय) शितल बोंडे, ऋषिकेश धस, डॉ.सोनाली चौधरी, महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजने मधील एम.सी.ओ.डॉ.पायल रोकडे, डॉ.दिव्यांनी मुंदाने, कल्याणी गाढवे त्याचप्रमाणे अधीसेविका चंदा खोडके व मालती प्रधान यांच्या सूचनेनुसार इन्चार्ज सिस्टर ज्योती तायडे, सरला राऊत, निलिमा मलवार, वैष्णवी निकम, माधुरी सोनटक्के, दीपाली तायवाडे, विवेक तायडे, अक्षय पवार, कीर्ती तायडे, यशोधरा नेवाडे, मयुरी खेरडे, ओम महल्ले, अनु वडे, योगिश्री पडोळे, वैशाली ढोबळे, कोमल भालेकर, रुपाली गवई, दीक्षा बेलखेडे, अर्चना मढावी, वैष्णवी टाकरखेडे, नम्रता दामले आहारतज्ञ कविता देशमुख, रश्मिता दिघडे, श्रीधर ढेंगे, औषध विभागामधील योगेश वाडेकर, अमोल वाडेकर, शुभम वरघडे, पंकज बेलुरकर, सुनीता ठाकूर, अविनाश राठोड, तुषार नारायण, गजानन मातकर, रूपेश हरडे, राहुल चव्हाण, रंजना दिपटे, मंगला भेंडकर, इंदू पाटील, गजानन चौधरी, प्रशांत थेटे, निलेश आत्राम, आशिष थुल, शिवा भोंगाळे इत्यादींचे किडनी प्रत्यारोपण शस्त्रक्रियेमध्ये विषेश सहकार्य होते.

## ९०च्या दशकातील तथाकथित 'डॉन'च्या आलिशान बंगल्यावर गुन्हे शाखेचा छापा

(प्रतिनिधी वरूड दर्पण)

### 'बाबा' डॉनच्या घरात ५ करोड रोख, सोन्या-चांदीसह मोठं घबाड सापडलं



**छत्रपती संभाजीनगर** – छत्रपती संभाजीनगर शहरात आज (११ जुलै) सकाळच्या सुमारास एक मोठी आणि तितकीच खळबळजनक घटना उजेडात आली आहे.

छत्रपती संभाजीनगरात ९०च्या दशकात दहशत निर्माण करणाऱ्या तथाकथित 'डॉन'च्या आलिशान बंगल्यावर गुन्हे शाखेने अचानक छापा टाकलाय. पडेगाव भागात पहाटेपासून सुरू झालेल्या कारवाई पोलिसांचा हाती मोठं घबाड सापडलंय. यावेळी परिसरात मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.

अचानक पडेगाव परिसरात सुरू असलेल्या या धडक कारवाईमुळे संपूर्ण गुन्हेगारी जगतासह छत्रपती संभाजीनगर शहरात एकच खळबळ उडाली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, बंगल्यातून साडे पाच कोट्यवधींची रोकड, सोने-चांदीचे दागिने आणि महत्त्वाची कागदपत्रे जप्त झाल्याची प्राथमिक माहिती आहे.

तर यावेळी रोकड मोजण्यासाठी नोटा मोजण्याची मशीन मागवण्यात आल्याची माहिती आहे. ५ करोड रोख, सोन्या-चांदीसह मोठं घबाड सापडलं गुन्हे शाखेच्या अधिकाऱ्यांकडून आर्थिक व्यवहार, मालमत्ता आणि संबंधित कागदपत्रांची कसून तपासणी सुरु करण्यात आली असून या कारवाईबाबत पोलिसांकडून अधिकृत माहिती जाहीर करण्यात येणार असल्याचे सांगितलं गेलंय. याकारवाईत काही चाकू, तलवारी, बंदूक (लायसन आहेत), एक विनापरवाना आहे. ३ एअर गन ४०० ते ५०० काडतुसे मिळाली आहेत.

## मुंबई पोलिसांसाठी ४० हजार नवी घरे!

(प्रतिनिधी वरूड दर्पण)

***मुंबई*** – मुंबई पोलीस दलातील अधिकारी-कर्मचाऱ्यांसाठी मुंबईत ४० हजार नवीन शासकीय पोलीस सेवा निवासस्थाने उभारण्यात येणार आहेत.

याशिवाय मुंबईत ९३ अत्याधुनिक आणि सर्व सुविधांनी सुसज्ज अशी नवीन पोलीस ठाण्यांची उभारणी करण्यात येणार असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी विधानसभेत दिली. याशिवाय पोलिसांना मालकी हक्काची घरे देण्यासाठी येत्या सात दिवसांत उच्चस्तरीय समिती स्थापन करण्यात येणार असल्याची घोषणाही फडणवीस यांनी यावेळी केली.

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची माहिती



विधानसभेत विरोधी पक्षाच्या वतीने मांडण्यात आलेल्या अंतिम आठवडा प्रस्तावावरील वादळी चर्चेला उत्तर देताना फडणवीस यांनी पोलिसांच्या घराचा प्रश्न सोडवण्यासाठी राज्य सरकारकडून सुरू असलेल्या प्रयत्नांची माहिती दिली. मुंबई पोलीस दल हे राज्यातील सर्वात मोठे दल आहे. मात्र, पोलिसांच्या निवासाचा प्रश्न आजही गंभीर आहे. अनेक कर्मचाऱ्यांना घरे उपलब्ध असली तरी त्यापैकी सुमारे ९० टक्के घरे निर्धारित निकषांपेक्षा लहान आहेत.

## जीर्ण इमारतीला स्वतंत्रपणे पुनर्विकासाचा पूर्ण अधिकार : उच्च न्यायालयाचा मोठा निर्णय

(प्रतिनीधी वरूड दर्पण)



***मुंबई*** – सोसायटीच्या संपूर्ण जमिनीची मालकी गृहनिर्माण संस्था फेडरेशनकडे असली तरीही त्याअंतर्गत असलेल्या एखाद्या जीर्ण इमारतीला स्वतंत्रपणे पुनर्विकास करण्याचा पूर्ण अधिकार आहे, असा महत्त्वपूर्ण निवाळ्रा देत उच्च न्यायालयाने ठाणे शहरातील विजय नागरी सोसायटीला मोठा दिलासा दिला. न्यायालयाच्या या निकालामुळे 'विजय नागरी सहकारी गृहनिर्माण संस्थे'च्या (इमारत क्र. १ ते ४) स्वतंत्र पुनर्विकासाचा मार्ग मोकळा झाला आहे. न्यायमूर्ती संदीप मारणे यांच्या एकलपीठाने 'विजय नागरी सहकारी गृहनिर्माण संस्था फेडरेशन'ने पुनर्विकासासाठी घातलेल्या जाचक अटी फेटाळून लावल्या. फेडरेशनला केवळ दोन आठवड्यांत सोसायटीला पुनर्विकासासाठी बिनशर्त ना-हरकत प्रमाणपत्र देण्याचे आदेश न्यायालयाने दिले. विजय नागरी सोसायटीला जीर्ण इमारतींचा पुनर्विकास करायचा होता. परंतु, संपूर्ण ७ इमारतींच्या लेआउट जमिनीची मालकी स्वतःकडे असल्याचा दावा करत फेडरेशनने या कामात अडथळा आणला होता. फेडरेशनने ऑगस्ट २०२३ मध्ये केवळ ३ महिन्यांची मर्यादित मुदत असलेली एक सशर्त एनओसी दिली होती. ही एनओसी पुनर्विकासाच्या मोठ्या प्रकल्पासाठी अपुरी होती. रस्ता, मोकळी जागा आणि थकीत पैशांची कारणे पुढे करून फेडरेशनकडून टाळाटाळ केली जात होती.

## तुकाराम मुंढेंच्या खात्याचा धसका की खरंच दूध खराब?

### साताऱ्यात शेतकऱ्याने रस्त्यावर ओतले शेकडो लिटर दूध

(प्रतिनीधी वरूड दर्पण)



***सातारा*** – महाराष्ट्रातील सातारा जिल्ह्यातून एक संभ्रमात टाकणारा व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर तुफान व्हायरल होत आहे.

माण तालुक्यातील मोही गावात एका शेतकऱ्याने चक्क शेकडो लिटर दुधाने भरलेले कॅन थेट रस्त्यावर ओतून दिले आहेत. या विचित्र घटनेमुळे संपूर्ण परिसरात खळबळ उडाली असून, यामागे कडक अधिकारी तुकाराम मुंढे यांच्या कारवाईची धास्ती तर नाही ना, अशी जोरदार चर्चा रंगू लागली आहे.

तुकाराम मुंढेंचा धसका आणि प्रशासनाच्या कारवाईची भीती? सध्या राज्यभरात अन्न व औषध प्रशासनाकडून दुधातील भेसळखोरांविरुद्ध अत्यंत तीव्र मोहीम राबवली जात आहे. 'आयएएस' अधिकारी तुकाराम मुंढे यांच्या कडक शिस्तीची आणि धडक कारवाईची सर्वांनाच माहिती आहे.

मोही गावात प्रशासनाची अचानक धाड पडणार, या भीतीनेच संबंधित शेतकऱ्याने हे भेसळयुक्त दूध रस्त्यावर ओतून देऊन पुरावा नष्ट केल्याचा दावा सोशल मीडियावरील व्हायरल मेसेजमध्ये केला जात आहे.

## आरबीआयचे नवे मध्यवर्ती कार्यालय नरिमन पॉइंटला : १५८६ कोटी रुपये खर्च

(प्रतिनिधी वरूड दर्पण)



**मुंबई** – भारतीय रिझर्व्ह बँकेने नरिमन पॉइंट येथे नवीन मध्यवर्ती कार्यालय टॉवरच्या बांधकामाची प्रक्रिया सुरू केली आहे. या प्रकल्पाचा अंदाजित खर्च १,५८६ कोटी रुपये आहे.

मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेडकडून गेल्या वर्षी विकत घेतलेल्या जमिनीवर हा टॉवर उभारला जाणार आहे. हा व्यवहार शहरातील सर्वात मोठ्या शासकीय-ते-शासकीय रिअल इस्टेट व्यवहारांपैकी एक होता.

आरबीआयच्या मालमत्ता विभागाने जारी केलेल्या निविदा सूचनेनुसार, ही निविदा आरबीआयच्या पॅनेलवर असलेल्या डिझाईन आणि बिल्ड बांधकाम संस्थांमध्ये प्रसिद्ध करण्यात आली असून, केंद्रीय बँकेने 'स्टेज-१' संकल्पना डिझाइन सादर करण्याची मुदत १३ जुलैपर्यंत वाढवली आहे.

# भारत केवळ बाजारपेठ नाही तर जागतिक विकासाचे लॉन्चपॅड : पंतप्रधान मोदी

(प्रतिनिधी वरूड दर्पण)



**नवी दिल्ली** – पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारत हा केवळ मोठी बाजारपेठ नसून जागतिक विकासाचे 'लॉन्चपॅड' बनल्याचे ठामपणे सांगितले. न्यूझीलंडचे पंतप्रधान क्रिस्टोफर लक्सन यांच्या उपस्थितीत ऑकलंड येथे दोन्ही देशांतील प्रमुख उद्योगपती आणि मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना (सीईओ) संबोधित करताना त्यांनी भारत-न्यूझीलंड आर्थिक सहकार्याला नवी दिशा देण्याचे आवाहन केले. मुक्त व्यापार करारामुळे (एफटीए) व्यापार, गुंतवणूक, तंत्रज्ञान, सेवा आणि कुशल मनुष्यबळाच्या देवाणघेवाणीसाठी मोठ्या संधी उपलब्ध होतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

मोदी म्हणाले की, भारत आणि न्यूझीलंड हे लोकशाही, कायद्याचे राज्य, विविधतेचा आदर आणि शाश्वत विकासाच्या समान मूल्यांनी जोडलेले आहेत. या सामायिक मूल्यांच्या बळावर दोन्ही देशांतील आर्थिक भागीदारी अधिक मजबूत होईल. अवघ्या नऊ महिन्यांच्या विक्रमी कालावधीत मुक्त व्यापार करार पूर्ण होणे ही द्विपक्षीय संबंधांतील ऐतिहासिक कामगिरी असल्याचे त्यांनी नमूद केले. वर्ष २०३० पर्यंत दोन्ही देशांमधील द्विपक्षीय व्यापार दुप्पट करून सात अब्ज न्यूझीलंड डॉलरपर्यंत नेण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. न्यूझीलंडने पुढील १५ वर्षांत भारतात २० अब्ज डॉलरची गुंतवणूक करण्याची बांधिलकी जाहीर केल्याचे सांगताना मोदी यांनी ही केवळ आर्थिक गुंतवणूक नसून भारताच्या विकास प्रवासातील भागीदारी असल्याचे स्पष्ट केले. भारत ही जगातील सर्वात वेगाने वाढणारी प्रमुख अर्थव्यवस्था असून वाढता मध्यमवर्ग, डिजिटल क्रांती, आधुनिक पायाभूत सुविधा, कुशल युवा मनुष्यबळ आणि सातत्यपूर्ण आर्थिक सुधारणा यामुळे गुंतवणूकदारांसाठी मोठ्या संधी निर्माण झाल्या आहेत. धोरणात्मक स्थैर्य, राजकीय स्थिरता आणि सातत्यपूर्ण विकासामुळे भारत जागतिक आर्थिक वाढीचे महत्त्वाचे केंद्र बनल्याचे त्यांनी सांगितले. उत्पादन आधारित प्रोत्साहन (पीएलआय) योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन करताना त्यांनी अन्न प्रक्रिया, वस्त्रोद्योगासह १४ क्षेत्रांसाठी सुमारे २० अब्ज डॉलरचे प्रोत्साहन उपलब्ध असल्याचे सांगितले. न्यूझीलंडमधील कंपन्यांनी भारताच्या उत्पादन क्षेत्रात सक्रिय सहभाग घ्यावा, असे त्यांनी आवाहन केले. भारतातील विमानतळ, प्रादेशिक हवाई संपर्क, एअर कार्गो आणि पर्यटन क्षेत्र झपाट्याने विकसित होत असून भारत जगातील तिसरी सर्वात मोठी देशांतर्गत विमान वाहतूक बाजारपेठ बनल्याचे त्यांनी नमूद केले.

# ट्रेनचा मार्ग बदलल्याने वेलंकनी यात्रेकरूंना मनस्ताप

## प्रवाशांचा वसई स्थानकात ठिय्या, रेल्वेकडून पर्यायी विशेष गाडीची व्यवस्था

(प्रतिनीधी वरूड दर्पण)




**मुंबई** – वसईहून कल्याण व पुणे मार्गे तामिळनाडूतील वेलंकनी येथे जाणाऱ्या हजारो यात्रेकरूंना गुरुवारी मोठा मनस्ताप सहन करावा लागला. अहमदाबाद जंक्शन-तिरुचिरापल्ली एक्स्प्रेसचा मार्ग कोणतीही पूर्वसूचना न देता अचानक बदलून ती सुरतपूर्वीच सोलापूरमार्गे वळिवण्यात आल्याने दोन महिन्यांपूर्वी आरक्षण केलेल्या हजारो प्रवाशांचा संताप अनावर झाला. संतप्त प्रवाशांनी वसई रोड रेल्वे स्थानकात ठिय्या आंदोलन करत पर्यायी गाडीची मागणी केली. अखेर लोकप्रतिनिधींच्या हस्तक्षेपानंतर रेल्वे प्रशासनाने यात्रेकरूंसाठी विशेष गाडीची व्यवस्था केल्याने प्रवाशांना मोठा दिलासा मिळाला.

देशातील ख्रिस्ती समाजाचे प्रमुख श्रद्धास्थान असलेल्या तमिळनाडूतील वेलंकनी येथे मरिया मातेच्या नोव्हेनानिमित्त दरवर्षी लाखो भाविक दाखल होतात. यामध्ये वसई परिसरातील ख्रिस्ती बांधवांचा मोठ्या प्रमाणावर सहभाग असतो. सध्या मासेमारी बंदीचा कालावधी सुरू असल्याने वसईतील सामान्य ख्रिस्ती नागरिक तसेच ख्रिस्ती कोळी बांधवांनी सुमारे दोन महिन्यांपूर्वीच यात्रेसाठी रेल्वे आरक्षण केले होते. या घटनेची माहिती समाजमाध्यमांवर वेगाने प्रसारित झाल्यानंतर पालघरचे खासदार डॉ.हेमंत सवरा, तसेच पालघरचे आजी-माजी खासदार आणि वसई-नालासोपारा मतदारसंघातील आजी-माजी आमदार यांनी रेल्वे प्रशासनाशी संपर्क साधून प्रवाशांच्या समस्येची तातडीने दखल घेण्याची मागणी केली. त्यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यानंतर रेल्वे प्रशासनाने मध्यरात्री यात्रेकरूंसाठी वसई रोड ते दौंडदरम्यान विशेष गाडीची व्यवस्था केली. रात्री सुमारे ३ वाजता ही विशेष गाडी वसई रोड स्थानकातून रवाना करण्यात आली.

# राम मंदिरातील २३ कर्मचाऱ्यांचे सामूहिक राजीनामे

(प्रतिनीधी वरूड दर्पण)

## तपासाची भीती, कामाचे तास वाढले, ताणही वाढला



**लखनऊ** – अयोध्येतील राम मंदिरातील देणगी चोरी प्रकरणानंतर देणगीची मोजदाद करणाऱ्या २३ कर्मचाऱ्यांनी सामूहिकरीत्या राजीनामे दिले आहेत. कामाचे वाढलेले तास, अतिरिक्त ताण व पुरेसा पगार नाही अशी कारणे त्यांनी दिली आहेत. आता तेथे केवळ १३ कर्मचारी बाकी राहिले आहेत.

अपहार प्रकरण उघड होण्यापूर्वी देणग्यांची मोजदाद दोन शिफ्टमध्ये केली जात असे. शिवाय, कामाची विभागणी केली जात असे. प्रत्येक कर्मचाऱ्याची ड्युटी जवळपास ६ तासांची होती, असे कर्मचारी सांगतात. या व्यवस्थेत बरेच बदल करण्यात आले आहेत. सगळे काम एकाच शिफ्टमध्ये केले जाऊ लागले आहे. त्यामुळे कामाचे तास ६ वरुन ९ तासांवर गेल्याचा आरोप कर्मचाऱ्यांनी केला आहे. कामाचा दबाव वाढला आहे. पण सुविधांमध्ये वाढ झालेली नाही, अशी कर्मचाऱ्यांची व्यथा आहे.

गुरुवारी संध्याकाळी ड्युटी संपताच कर्मचाऱ्यांनी सामूहिकपणे विरोध दर्शवला. यानंतर त्यांनी एसबीआयच्या तुलसी उद्यान शाखा आणि संबंधित सुरक्षा एजन्सी यांच्याकडे मागण्यांचे पत्र आणि राजीनामे दिले. मागण्यांवर कोणतेही सकारात्मक उत्तर न मिळाल्याने कर्मचाऱ्यांनी नोकरी सोडण्याचा निर्णय घेतला. सामूहिक राजीनाम्यांचा परिणाम दुसऱ्याच दिवशी दिसून आला.

जमिनीवर बसून काम मंदिर ट्रस्टच्या सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, गैरव्यवहाराचे प्रकरण समोर आल्यानंतर कर्मचाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण आहे. यामुळे सुमारे ४० कर्मचाऱ्यांपैकी केवळ १५-२० कर्मचारीच नियमित कामावर हजर राहत होते. या प्रकरणाचा तपास सुरू झाल्यानंतर मंदिर प्रशासनाने सुरक्षेत आणि सतर्कतेत मोठी वाढ केली आहे. कर्मचाऱ्यांना आत जाण्यापूर्वी अनेकदा तपासणीला सामोरे जावे लागते. आत प्रवेश करताना अनवाणी असावे लागते आणि मंदिराच्या आवारात अनेक सुरक्षा तपासणी नाक्यांवरून जावे लागते. पूर्वी टेबल-खुर्चीवर बसून मोजणी केली जात होती, ती आता जमिनीवर बसून करावी लागत आहे.

# पोलिसांसमोरच राडा, पोलीस ठाण्यातील खिडक्यांच्या काचाही फुटल्या : प्रेम प्रकरणाचे नाट्यमय वळण

(प्रतिनीधी वरूड दर्पण)



**जळगाव** –पोलिसांसमोरच जळगावच्या एमआयडीसी पोलीस ठाण्यात दोन गटांनी मारामारी केल्याची खळबळजनक घटना घडली आहे. शुक्रवारी रात्री ही घटना घडली असून विवाहानंतर पोलीस ठाण्यात दाखल झालेल्या तरुण-तरुणीच्या प्रेम प्रकरणाने हे नाट्यमय वळण घेतले. याबाबत दोघांच्याही कुटुंबियांना माहिती मिळताच त्यांनी पोलीस स्टेशनमध्ये एकच गोंधळ घातला.

जळगाव तालुक्यातील एका गावातील तरुण आणि एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या हद्दीत राहणारी एक तरुणी यांच्यात प्रेमसंबंध होते. मात्र या प्रेमसंबंधाला कुटुंबीयांचा विरोध होता. या कारणास्तव दोघांनी काही दिवसांपूर्वी घर सोडले. त्यानंतर त्यांनी परस्पर संमतीने विवाह केला. विवाहानंतर भविष्यात कोणताही वाद निर्माण होऊ नये तसेच कायदेशीर संरक्षण मिळावे या उद्देशाने दोघांनी शुक्रवारी एमआयडीसी पोलीस ठाण्यात हजेरी लावली. तरुण-तरुणी प्रेमविवाह करुन पोलीस ठाण्यात आल्याची माहिती मिळताच दोन्ही कुटुंबीयांसह त्यांचे नातेवाईक आणि समर्थक मोठ्या संख्येने तेथे पोहोचले. सुरुवातीला दोन्ही बाजूंमध्ये तरुण-तरुणीच्या निर्णयावरून शाब्दिक वाद झाले. पोलिसांनी मध्यस्थी करून वातावरण शांत करण्याचा प्रयत्न केला.

# ११ मिनिटांत सात स्फोटांनी हादरली होती मुंबई

(प्रतिनीधी वरूड दर्पण)

## हल्ल्याला २० वर्षे, मृतांना पश्चिम रेल्वेकडून श्रद्धांजली



**मुंबई** – मुंबईच्या उपनगरी रेल्वे सेवेला लक्ष्य करत ११ जुलै २००६ रोजी घडवण्यात आलेल्या भीषण ७/११ बॉम्बस्फोटाला आज २० वर्षे पूर्ण झाली. या हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या १८० हून अधिक प्रवाशांना पश्चिम रेल्वेकडून शनिवारी (दि.११) माहिम रेल्वे स्थानकात पुष्पचक्र अर्पण करून श्रद्धांजली वाहण्यात आली. या हल्ल्यात सुमारे ८०० जण जखमी झाले होते.

माहिम स्थानकात श्रद्धांजली पश्चिम रेल्वेचे वरिष्ठ अधिकारी आणि कर्मचारी माहिम स्थानकातील स्मारकाजवळ एकत्र आले आणि मृतांना श्रद्धांजली अर्पण केली. यावेळी पश्चिम रेल्वेचे प्रधान मुख्य कार्मिक अधिकारी (झउझज) सहर्ष बाजपेयी यांनी या घटनेची आठवण काढत, अशा प्रकारची घटना पुन्हा कधीही घडू नये, अशी प्रार्थना केली.

त्यांनी सांगितले, 'दरवर्षी या दुर्दैवी घटनेत मृत्युमुखी पडलेल्यांना आम्ही श्रद्धांजली अर्पण करतो. आज या घटनेला २० वर्षे पूर्ण झाली आहेत. भविष्यात अशी घटना पुन्हा कधीच घडू नये, अशी ईश्वरचरणी प्रार्थना आहे.'

११ मिनिटांत सात स्फोटांनी हादरली होती मुंबई ११ जुलै २००६ रोजी सायंकाळी ६.२४ वाजल्यापासून अवघ्या ११ मिनिटांच्या कालावधीत पश्चिम रेल्वेच्या उपनगरी लोकलमधील प्रथम श्रेणीच्या डब्यांमध्ये सात साखळी बॉम्बस्फोट घडवण्यात आले. हे स्फोट माटुंगा रोड, माहिम जंक्शन, वांद्रे, खार रोड, जोगेश्वरी, भाईंदर आणि बोरीवली स्थानकांजवळ झाले.

तपासानुसार, प्रेशर कुकरमध्ये लपवून ठेवलेल्या स्फोटकांचा वापर या हल्ल्यासाठी करण्यात आला होता. या भीषण हल्ल्यात १८० हून अधिक जणांचा मृत्यू झाला, तर सुमारे ८०० प्रवासी जखमी झाले.

माहिमसह सात स्थानकांवर स्मारक या हल्ल्यानंतर पश्चिम रेल्वेने माहिम स्थानकात स्मारक उभारले असून, ज्या सात स्थानकांवर स्फोट झाले तेथे स्मृतिफलक बसवण्यात आले आहेत. दरवर्षी ११ जुलै रोजी या स्मारकांवर श्रद्धांजली वाहून मृतांचे स्मरण केले जाते.

तपासात अनेक आरोपींना अटक या साखळी बॉम्बस्फोटानंतर मुंबई पोलिसांसह विविध तपास यंत्रणांनी व्यापक तपास सुरू केला होता. सुरुवातीला लष्कर-ए-तोयबा आणि बंदी घालण्यात आलेल्या स्टुडंट्स इस्लामिक मूव्हमेंट ऑफ इंडिया (डखचख) या संघटनांवर संशय व्यक्त करण्यात आला होता. पुढील तपासात इंडियन मुजाहिदीनशी संबंधित काही आरोपींना अटक करण्यात आली आणि न्यायालयीन प्रक्रियेनंतर त्यांच्यावर कारवाई करण्यात आली.

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील**
**श्री.व्ही.व्ही.राजुरकर, दुसरे सहदिवाणी न्यायाधीश ( क.स्तर )**
**वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.५०१/२०२६** **ने.ता.२८/०७/२०२६**

**अर्जदार :-** १) श्रीमती अंजनाबाई किसनराव उर्फ कृष्णराव तरार, वय अं.८० वर्ष, धंदा-घरकाम, २) विनोद किसनराव उर्फ कृष्णराव तरार, वय अं.५६ वर्ष, धंदा- मजुरी, ३) महेश किसनराव उर्फ कृष्णराव तरार, वय अं.५० वर्ष, धंदा- मजुरी, ४) सौ.कल्पना इंद्रकुमार बेलसरे, वय अं.५१ वर्ष, धंदा-घरकाम, क्र.१ ते ४ रा.मु.पो.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** **निरंक ( कोणीही नाही )**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मय्यत किसनराव उर्फ कृष्णराव श्रावण तरार, रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.२८/०७/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **३०/०६/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

## जाहीर नोटीस

**प्रति**
**मा.ठाणेदार साहेब**
**पोलीस स्टेशन, वरुड, ता.वरुड, जि.अमरावती**

**अर्जदार :-** प्रिया करणराव मुंदाने
वय अं.२९ वर्ष, धंदा-शिक्षण
रा.पो.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती

**विरुध्द :- माझी १२ वी ची ओरीजिनल टी.सी. हरविल्याबाबत**

**महोदय,**

**मी** खालील सही करणार विनंती पुर्वक अर्ज सादर करते की, मी वरील ठिकाणी राहत असुन मी हुतात्मा राष्ट्रीय कनिष्ठ महाविद्यालय आष्टी, ता.आष्टी, जि.वर्धा येथे सन मार्च २०१५-२०१६ मध्ये वर्ग १२ वी मध्ये शिकत होतो. सदरहु विद्यालय मधुन मी सन २०१५-२०१६ मध्ये वर्ग १२ वी ची परिक्षा उत्तीर्ण झालो. तेव्हा मलाविद्यालय, आष्टी येथुन वर्ग १२ वी ची टी.सी.ओरीजिनल मिळालेली होती. परंतु सदरहु टी.सी. दि.०७/०६/२०२६ रोजी सकाळी १० वा चे सुमारास पांढुर्णा चौक, वरुड येथे हरविलेली आहे. त्याबाबत चौकशी केली असता दिसुन आली नाही.

तरी सदरहु टी.सी.चा दुसरे व्यक्तीने गैरवापर कर नये व हरविलेल्या कागदपत्राची मला संबधित कॉलेज मधुन व्दिलीय प्रत मिळावी.

करीता सेवेशी सादर आहे.

दि.१०/०७/२०२६

वरुड


**सहि अर्जदाराची**




# अजित पवार अपघाती निधन : अंतिम रिपोर्ट जानेवारीपूर्वी अपेक्षित

## नंतरच तपासाला दिशा मिळेल : मुख्यमंत्री फडणवीस

*(प्रतिनीधी वरुड दर्पण)*



**मुंबई** – पावसाळी अधिवेशनाच्या अखेरच्या दिवशी अंतिम आठवडा प्रस्तावाला उत्तर देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिवंगत नेते अजित पवार यांचा अपघाती मृत्यू आणि त्याच्या तपासाविषयी माहिती दिली. मुख्यमंत्र्यांनी सांगितले की, अजित पवार यांच्या संदर्भात दोन प्रकारे तपास सुरु आहे, सीआयडी व एएआयबी तपास करत आहे. जेवढे डाऊनलोड करायचे ते डॉक्युमेंट डाऊनलोड झाले आहे. ब्लॅक बॉक्स मधील सर्व माहिती घेतली आहे. एक प्रिमिलरी रिपोर्ट आला आहे, मात्र सगळा अंतिम रिपोर्ट हा जानेवारीपूर्वी येईल. हा अहवाल आल्यानंतरच सीबीआयच्या तपासाला दिशा मिळणार आहे. त्यामुळे या अहवालाची प्रतीक्षा सर्वांनाच आहे. तसे अहवालासाठी तीन ते चार वर्षे लागतात, हे खरे आहे. पण केंद्र सरकारने विनंती केली आहे, म्हणून दादांच्या पुण्यतिथी आधी हा रिपोर्ट यावा. या रिपोर्टनंतर सीबीआय किंवा सीआयडी यांना धागेदोरे मिळतील. सीआयडी तपासानुसार पायलट सुमित कपूर यांच्यावर शंका होती, त्यांचे सर्व बँक खाते तपासले, पण त्याच संशयास्पद आढळले नाही.

# दारूच्या नशेत घरात डोकावल्याचा संशय : पर्यटकाला चिखलात तुडवून संपवलं

*(प्रतिनीधी वरुड दर्पण)*

**मुंबई** – निसर्गरम्य वातावरणाचा आनंद घेण्यासाठी सातारा जिल्ह्यातील महाबळेश्वर तालुक्यातील पाचगणी परिसरात आलेल्या एका पर्यटकाचा अतिशय दुर्दैवी अंत झाला आहे.

महाबळेश्वर तालुक्यातील भोसे येथे घरात डोकावल्याच्या संशयावरून भिगवण येथील अक्षय रमेश जाधव या २४ वर्षीय युवकाची लाकडी दांडके आणि लाथाबुक्क्यांनी चिखलात तुडवून हत्या करण्यात आल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी पाचगणी पोलिसांनी मुख्य संशयित आरोपीसह वाई परिसरातील चार जणांना अटक केली आहे.

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, भिगवण येथील अक्षय जाधव हा आपल्या मित्रांसोबत पाचगणी परिसरात फिरण्यासाठी आला होता. भोसे येथील एका लॉजवर ते मुक्कामास होते. दरम्यान, अक्षय हा प्रचंड दारूच्या नशेत असल्यामुळे मित्रांनी सुरक्षेचा उपाय म्हणून त्याला राहत्या खोलीत कोंडून ठेवले होते. मात्र, काही वेळाने अक्षयने खोलीचा दरवाजा उघडून बाहेर धाव घेतली.

# सरसकट कर्जमाफी! शेतकऱ्यांना २ लाखांपर्यंत मदत

## ५० हजारांची अट काढली, ५६ लाख शेतकऱ्यांना लाभ

*(प्रतिनिधी वरुड दर्पण)*



**मुंबई** – सन २०१९ मध्ये जाहीर झालेल्या 'महात्मा फुले शेतकरी कर्जमुक्ती' योजनेचा लाभ घेतलेल्या शेतकऱ्यांना प्रोत्साहनपर ५० हजारऐवजी दोन लाख रुपयांची कर्जमाफी देण्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी विधानसभेत केली. तसेच प्रोत्साहन योजनेत सन २०२६–२७ या आर्थिक वर्षात कर्ज भरण्याची अटही रद्द करत असल्याचे जाहीर करत मागील कोणत्याही दोन वर्षांत कर्ज भरलेल्यांना योजनेचा लाभ देण्यात येईल, असेही फडणवीस यांनी सांगितले.

विधानसभेत विरोधी पक्षाच्या वतीने मांडण्यात आलेल्या अंतिम आठवडा प्रस्तावावरील चर्चेत सहभागी होताना विरोधी पक्षाच्या सदस्यांनी 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती' योजनेत सरसकट कर्जमाफीची मागणी केली होती. तर भाजपच्या आमदारांनी भेट घेऊन २०१९ च्या कर्जमाफी योजनेचा लाभ घेतलेल्या शेतकऱ्यांना नव्या योजनेत सामावून घेण्याची मागणी केली होती.

या पार्श्वभूमीवर अंतिम आठवडा प्रस्तावावरील चर्चेला उत्तर देताना फडणवीस यांनी आमदार रणधीर सावरकर यांच्या नेतृत्त्वाखालील आमदारांच्या शिष्टमंडळाने माझी भेट घेऊन २०१९ मध्ये 'महात्मा फुले कर्जमाफी' योजनेत लाभ मिळालेल्या शेतकऱ्यांना ५० हजार ऐवजी १ लाख रुपये तरी कर्जमाफीची रक्कम द्यावी, अशी मागणी केली, याची माहिती दिली. मग ५ टक्के शेतकऱ्यांना तरी का यातून वगळायचे यासाठी आम्ही सर्वांना २ लाखापर्यंतच्या रकमेची कर्जमाफी देण्याचा निर्णय घेतला असून, त्याचा लाभ ५६ लाख शेतकऱ्यांना होणार असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

# पुण्यातील १५ अधिकारी निलंबित : उपजिल्हाधिकारी, तहसीलदारांचा समावेश, चंद्रशेखर बावनकुळे यांची घोषणा

*(प्रतिनीधी वरुड दर्पण)*



**मुंबई** - जमीन महसूल अधिनियमातील 'कलम १५५'चा गैरवापर करून बेकायदेशीररीत्या जमिनींचे फेरफार करणाऱ्या महसूल विभागातील उपजिल्हाधिकारी आणि तहसीलदार यांच्यासह १५ अधिकाऱ्यांना तत्काळ निलंबित करण्यात आले आहे.

महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी शुक्रवारी विधान परिषदेत या धडक कारवाईची घोषणा केली. या अधिकाऱ्यांचे केवळ निलंबन करून न थांबता, दोषींवर फौजदारी गुन्हे दाखल केले जातील आणि काहींना सेवेतून बडतर्फ केले जाईल, असा कडक इशाराही मंत्र्यांनी दिला.

शिवसेना (उबाठा) आमदार अनिल परब यांनी गेल्या अधिवेशनात या गंभीर गैरव्यवहाराकडे लक्ष वेधले होते. त्यानंतर पुणे विभागाची चौकशी पूर्ण करून सरकारने ही मोठी कारवाई केली आहे.

महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियमातील 'कलम १५५' चा वापर केवळ शासकीय दस्तऐवजांमधील शुद्धलेखनाच्या किंवा लिपिकीय चुका दुरुस्त करणे अपेक्षित असते. मात्र, अधिकाऱ्यांनी अधिकारांचा गैरवापर करून थेट जमिनींच्या मालकी हक्कातच फेरफार केले.एका व्यक्तीची करोडोंची प्रॉपर्टी दुसऱ्याच्या नावावर करण्याचे गंभीर प्रकार चौकशीत उघडकीस आले आहेत.

गैरव्यवहार झालेल्या जमिनी मूळ मालकांना देणार पुनर्निरीक्षण करून मूळ मालकांच्या जमिनी त्यांना परत करण्याची मोठी प्रक्रिया आम्ही सुरू केली आहे.

पुणे विभागाच्या चौकशीत एकूण ४२४ प्रकरणे संशयास्पद आढळली असून त्यांची पुढील ३ महिन्यांत संपूर्ण महाराष्ट्रात तपासणी पुणे विभागातील हा धक्कादायक प्रकार समोर आल्यानंतर आता संपूर्ण राज्यात मागील ५ वर्षांत 'कलम १५५' अंतर्गत झालेल्या सर्व आदेशांची तपासणी करण्याचे निर्देश सर्व जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत.







